Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३२ ] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ११-१७, २०२२/ श्रावण २०-२६, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक- शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-५ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-२ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४२४.

### उपविभागीय अधिकारी तथा भूसपांदन अधिकारी, यांजकडून

क्रमांक उविअ-भूसंपादन-कावि-३९९–२०२२.—

सर्वत्र लोकांना या जाहिर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी मौजे डाबकी, तहसील व जिल्हा-अकोला येथील ए.एम.-८५ हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत शेगाव पालखी मार्ग अकोला रस्त्याचे बांधकामासाठी जमीन थेट खरेदीने संपादित करणे बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर जमिनीचे वर्णन व भूधारकांची माहिती निम्नलिखीतप्रमाणे आहे. सदर प्रस्ताव सरळ खरेदीने संपादित करण्याकरीता विचाराधिन आहे.

**अनुसूची**

भूंसपादन प्रकरण क्रमांक एल. ए. क्यु-४७-डाबकी-२-२०२१-२२

| अ. क्र. | शेतक-यांचे नाव | मौजा | स.नं./ गट नं. | एकू ण क्षेत्र | खरेदी संमती दिलेले संपादित करावयाचे क्षेत्र | भूधारणा पध्दती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | हे. आर | हे. आर | |
| १ | श्रीकांत भगवानदास पटेल | | | | | |
| | खुशबु भगवानदास पटेल | डाबकी | १२५ | २ ३० | ० ६१ | वर्ग-१ |

उपरोक्त मालमत्तांबाबतीत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध गहाण, उजर, ताबा, वारसाहक्क किंवा शासकीय, निमशासकीय, खाजगी वित्तिय संस्थेचा बोजा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस जाहिर झाल्यापासून ७ (सात दिवस) दिवसांचे आत आमचे पक्षकाराचे कार्यालयामध्ये अथवा वकिलाकडे कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी. सदरहू कालावधीमध्ये कोणाचीही हरकत/आक्षेप न आल्यास शासन कायद्यानुसार थेट खरेदीद्वारे जमीन संपादित करण्यास मोकळे राहतील व त्यानंतर कोणाचीही/कोणत्याही प्रकारची उजर/तक्रार चालणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अकोला :
दिनांक २२ जुलै २०२२.

**डॉ. निलेश अपार,**
उपविभागीय अधिकारी
तथा
भूसंपादन अधिकारी, अकोला

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४२५.

**भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ-शिरस्तेदार–कावि-११३५–२०२२.––

ज्याअर्थी, भूमी संपादन ,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे ) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ३९६-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनिमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्ह्यातील ५००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अकोला जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दि.१३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकानं अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यांस विशेष परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी,भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) त्यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करीत आहेत.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, अकोला उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, बाळापूर यांस पदनिर्देशित केले आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक-एल.ए.क्यु.-४७-अंत्री मलकापुर-८-२०२०-२१,

गाव अंत्री मलकापुर, ता. बाळापुर, जिल्हा अकोला

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३९६ | ० ०८ |
| २ | ३९६ | ० ११ |
| | एकूण क्षेत्र . . | ० १९ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव :— कारंजा, रमजानपूर (नया अंदुरा) संग्राहक ल. पा. योजना, अंतर्गत मौजे अंत्री मलकापुर येथील बुडीत क्षेत्राकरीता भूसंपादन करणेकरीता.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— कारंजा-रमजानपूर (नया अंदुरा) संग्राहक ल. पा. योजना, ता. बाळापूर, जि. अकोला या प्रकल्पांतर्गत मौजे अंत्री मलकापुर येथील बुडीत क्षेत्राकरीता भूसंपादन करणेकरीता.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

या प्रकल्पामुळे कोणतेही गाव बाधित होत नाही.

**अनुसूची-चार**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दिनांक १३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**अनुसूची-पाच**

विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणूक झाली नसल्यामुळे माहिती निरंक.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४२६.

**भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ-शिरस्तेदार–कावि-११४२–२०२२.—

ज्याअर्थी, भूमी संपादन ,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम , २०१३ (२०१३ चा ३०) यापुढे (ज्यांचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे ) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनिमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्ह्यातील ५००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अकोला जिल्हयांच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दि.१३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकान अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यांस विशेष परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणतयाही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) त्यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करीत आहेत.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, अकोला उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तथा भूसंपादन अधिकारी, बाळापूर यांस पदनिर्देशित केले आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक-एल. ए. क्यु.-४७ उरळ बु.-७-२०२०-२१,

गाव उरळ बु., ता. बाळापुर, जिल्हा अकोला

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ११ | ० २४ |
| | एकूण क्षेत्र . . | ० २४ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव :— कारंजा-रमजानपूर (नया अंदुरा) संग्राहक ल. पा. योजना, अंतर्गत मौजे उरळ बु. येथील बुडीत क्षेत्राकरीता भूसंपादन करणेकरीता.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— कारंजा-रमजानपूर (नया अंदुरा ) संग्राहक ल. पा. योजना, ता. बाळापूर, जि. अकोला या प्रकल्पांतर्गत मौजे उरळ बु. येथील बुडीत क्षेत्राकरीता भूसंपादन करणेकरीता.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

या प्रकल्पामुळे कोणतेही गाव बाधित होत नाही.

**अनुसूची-चार**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दिनांक १३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**अनुसूची-पाच**

विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणूक झालेली नसल्यामुळे माहिती निरंक.

बाळापूर :
दिनांक २६ जुलै २०२२.

**डॉ. रामेश्वर पुरी,**
उपविभागीय अधिकारी
तथा
भूसंपादन अधिकारी, बाळापूर.

अ.-एक-२ (१६४७).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.